# ठाणेनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


## पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १७७ /२०२५ दि. १३ /०८/२०२५

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक १६/०८/२०२५ रोजी दहिहंडी उत्सव– २०२५ निमित्ताने १) टेंभीनाका मित्रमंडळ, २) टॉवरनाका आनंद चॅरिटेबल ट्रस्ट, ३) व्यापरी मित्र मंडळ, ब्राम्हणसभा हॉल स्टेशन रोड, ४) बाळगोपाळ मित्र मंडळ, नारळवाला चाळ, स्टेशन रोड, ठाणे येथे सार्वजनिक दहिहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर दहिहंडी उत्सवाकरीता मुंबई व ठाणे परिसरातुन मोठया प्रमाणात गोविंदा पथके दहिहंडी फोडण्यासाठी येत असतात. सदरवेळी मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** जी. पी. ओ. कडून कोर्ट नाका मार्गे ठाणे रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जी. पी. ओ.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाणे मध्यवर्ती कारागृहाकडून क्रिक नाका मार्गे दादोजी कोंडदेव स्टेडीयम कडून उजवे वळण घेवून दादोजी कोंडदेव स्टेडीयम येथून डावे वळण घेवून ए वन फर्निचर मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **२)** कळवा व साकेत मार्गे ठाणे रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **उर्जिता हॉटेल समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने क्रिक नाका मार्गे डावीकडे वळण घेवुन दादोजी कोंडदेव स्टेडीयम कडुन उजविकडे वळण घेवुन ए वन फर्निचर मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **३)** ठाणे रेल्वे स्टेशन कडून टॉवर नाका/टेंभी नाका कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस, एस. टी. बसेस तसेच रिक्षा व चार चाकी लहान वाहनांना **डॉ. मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ठाणे रेल्वे स्टेशन कडून सॅटिस ब्रिजवरुन येणाऱ्या परिवहनच्या सर्व एस. टी. बसेस, टि.एम.टी. च्या सर्व बसेस बी कॅबिन सॅटिज ब्रिजवरुन गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच रिक्षा व चार चाकी लहान वाहने सॅटिज ब्रिजखालून ठाणे स्टेशन रोड, डॉ. मुस चौक मार्गे डावे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक १६/०८/२०२५ रोजी सकाळी ०७:०० वा. पासुन ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रत माहितीसाठी,**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, पो.नि. ठाणेनगर वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.